# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र. ०१ /का-८,

**निवडणूक तात्काळ**

**ई-मेलद्वारे**

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २४/१२/२०२०.

प्रति,

**जिल्हाधिकारी (सर्व).**

*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

विषय :- ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका २०२०-२०२१.
बँकेत स्वतंत्र खाते उघडण्याबाबत.

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दि. ११/१२/२०२० रोजीच्या आदेशान्वये दिलेला निवडणूक कार्यक्रम.
२. राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि. १५/१०/२०१६ चे आदेश.
३. राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि. ०२/०२/२०१७ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाच्याबाबतच्या संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये माहे एप्रिल-२०२० ते डिसेंबर-२०२० या कालावधीत मुदत संपणलेल्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दिनांक ११/१२/२०२० रोजी निवडणूक कार्यक्रम घोषित केला होता. सदर निवडणुकांमध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चासाठी संदर्भिय पत्र क्र. २ व ३ अन्वये राष्ट्रीयकृत बँक/शेड्युल बँक यामध्ये स्वतंत्र चालू/बचत बँक खाते उघडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तथापि, काही जिल्ह्यात बँकेत स्वतंत्र खाते उघडण्याबाबत बँकांकडून सहकार्य मिळत नसल्याबाबत आयोगास अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

या अनुषंगाने कळविण्यात येते कि, ग्रामपंचायत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना राष्ट्रीयकृत बँक/शेड्युल बँकेसह सहकारी बँकेतदेखील स्वतंत्र बँक खाते उघडण्यास अनुमती देण्यात येत आहे.

तरी ग्रामपंचायत निवडणुकांच्या अनुषंगाने स्वतंत्र बँक खाते उघडण्यासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना सहकार्य करण्याबाबत संबंधित बँकांना आपल्या स्तरावरून निर्देश देण्यात यावेत.

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार.

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र